सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

स्वसुख निरभिलाषः खिद्यते लोकहेतोः

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००

फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२

Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in


**क्रमांक:डीआरए-०५२२/प्र.क्र.८८/२०२२/जाहिरात** **दिनांक: ११ मे, २०२२**

## -: शुध्दिपत्र :-

**विषय: पशुधन विकास अधिकारी, महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा, गट-अ - पदसंख्या व आरक्षणातील बदलाबाबत**

**संदर्भ: जाहिरात क्रमांक-०१२/२०२२**

महाराष्ट्र शासनाच्या कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या आस्थापनेवरील **पशुधन विकास अधिकारी, महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा, गट-अ** या संवर्गातील एकूण २१२ पदांच्या भरतीकरीता दिनांक १४ फेब्रुवारी, २०२२ रोजी जाहिरात (जाहिरात क्रमांक ०१२/२०२२) प्रसिध्द करण्यात आली होती. तथापि, शासनाच्या, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाकडून दिनांक २७ एप्रिल, २०२२ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त अतिरिक्त ८६ पदांच्या मागणीनुसार, दिनांक १४ फेब्रुवारी, २०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीमधील पदसंख्या तसेच आरक्षणामध्ये बदल करण्यात येत असून भरावयाच्या एकूण २९८ पदांचा सामाजिक / समांतर आरक्षणाबाबतचा एकत्रित तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ. ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | आ.दु.घ. | इ.मा.व. | एकूण आरक्षित | अराखीव (खुला) | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकुण पदे | २४ | ०५ | ०१ | ०२ | ०३ | ०६ | -- | २१ | ५८ | १२० | ९२ | २९८ |
| सर्वसाधारण | १९ | ६ | ०१ | ०२ | ०३ | ०४ | -- | १९ | ५५ | १०९ | ८६ | १९५ |
| महिला | ०८ | ०३ | -- | ०१ | ०२ | ०२ | -- | ०८ | २५ | ४९ | ४१ | ९० |
| खेळाडू | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०४ | ०६ | ०७ | १३ |
| अनाथ | ०३ | | | | | | | | | | | |
| दिव्यांग | **एकूण २९८ पदांपैकी - ११ पदे दिव्यांगांसाठी राखीव** [**(१)** कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता (D / HH) - **०४ पदे**, **(२)** अस्थिव्यंगता / मेंदुचा पक्षघात (Cerebral Palsy) / कुष्ठरोग मुक्त (Leprosy Cured) / शारिरीक वाढ खुंटणे (Dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (Acid Attack Victims) / स्नायु विकृती (Muscular Dystrophy) - **०४ पदे, (३)** स्वमग्नता (Autism) / मंदबुध्दी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability) / विशिष्ट शिक्षण अक्षमता (Specific Learning Disability) / मानसिक आजार (Mental Illness) / वरील १ ते ३ मधील बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व (Multiple Disabiliites involving 1 to 3) - **०३ पदे**] | | | | | | | | | | | |

**२.** पदसंख्या व आरक्षणामध्ये वाढ / बदल झाल्यामुळे जाहिरात क्रमांक ०१२/२०२२ मध्ये नमूद आवश्यक अर्हतेनुसार अर्ज करु इच्छिणा-या उमेदवारांना अर्ज सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**३.** जाहिरात क्रमांक ०१२/२०२२ नुसार विहित पध्दतीने अर्ज केलेल्या उमेदवारांनी पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

**४. पात्रता:-**

४.१ शैक्षणिक अर्हता, अनुभव आणि वय गणण्याचा कालावधी तसेच इतर सर्व अटी व तरतुदी, दिनांक ८ ऑक्टोबर, २०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या तपशीलवार मूळ जाहिरात क्रमांक ०१२/२०२२ मध्ये नमूद केल्यानुसार राहतील.

४.२ **वयोमर्यादा मूळ जाहिरातीनुसार दिनांक १ जून, २०२२ रोजी गणण्यात येईल.**

४.३ **शैक्षणिक अर्हता आणि अनुभव दिनांक १४ मार्च, २०२२ पर्यन्तच ग्राह्य समजण्यात येईल.**

४.४ **शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-२०२१/प्र.क्र.६१/कार्या-१२, दिनांक १७ डिसेंबर, २०२१ अनुसार दिनांक १ मार्च, २०२० ते दिनांक १७ डिसेंबर, २०२१ या कालावधीत वयाधिक ठरणारे उमेदवार अर्ज करण्यास पात्र असतील.**

**५. अर्ज सादर करण्याचा तसेच परीक्षा शुल्क भरण्याचा कालावधी:-**

**५.१ अर्ज सादर करण्याचा कालावधी:-**

**दिनांक १२ मे, २०२२ रोजी १४.०० वाजल्यापासून दिनांक ०१ जून, २०२२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत.**

**५.२ ऑनलाईन परीक्षा शुल्क भरण्याकरीता विहित अंतिम दिनांक ०१ जून, २०२२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत.**

**५.३ भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेणे याकरीता विहित अंतिम दिनांक ०३ जून, २०२२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत.**

**५.४ चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक ०४ जून, २०२२ - बँकेच्या कार्यालयीन वेळेत.**

**६.** सदर शुध्दीपत्रक तसेच मूळ जाहिरात क्रमांक ०१२/२०२२ आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सह सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : मुंबई

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.

(२) प्रमाणपत्र तपासणीच्या वेळी पात्रतेसंदर्भातील सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास शिफारस/नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.